॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
अहंकार हा माणसाच्या प्रगतीचा मोठा शत्रू आहे.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.

आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

अहिल्यानगर | गुरुवार, दि. २२ मे २०२५ | वर्ष ६ वे | अंक ४० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## SPOT NEWS

### पूजा खेडकरला अटकपूर्व जामीन मंजूर

**नवी दिल्ली –** वादग्रस्त ठरलेल्या माजी आयएएस प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा मिळाला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळवून आयएएस पद गमावलेल्या पूजा खेडकरवर गुन्हा दाखल झालेला आहे. उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळल्यानंतर पूजा खेडकरने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात तिला सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. २०२२ मधील नागरी सेवा परीक्षेत फसवणूक आणि ओबीसी, दिव्यांग आरक्षणाचा चुकीच्या पद्धतीने फायदा घेण्यासह इतर आरोप खेडकरवर आहेत. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर हिला फसवणूक प्रकरणाच्या चौकशीत सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. दिल्ली पोलिसांच्या बाजू मांडणाऱ्या वकिलांनी खेडकरला अटकपूर्व जामीन देण्यास जोरदार विरोध दर्शवला. त्या तपासात सहकार्य करत नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच त्यांच्याविरुद्धचे आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याचे सांगत पोलिसांनी तिच्या जामिनाला विरोध केला.

### छत्तीसगडमधील चकमकीत २७ नक्षलवादी ठार

**नागपूर –** छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात आज सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले. या चकमकीदरम्यान, सुरक्षा दलांनी २७ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. ज्यामध्ये बसवराजूचा समावेश होता, ज्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस होते. या चकमकीत एक जवान देखील शहीद झाला तर एक जखमी झाला असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अबुझमद परिसरात सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली. नारायणपूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक प्रभात कुमार म्हणाले की, जिल्ह्यातील अबुझमद भागातील माड विभागात नक्षलवाद्यांच्या उपस्थितीच्या माहितीच्या आधारे, जिल्हा राखीव रक्षक (डीआरजी) नारायणपूर, डीआरजी दंतेवाडा, डीआरजी बिजापूर आणि डीआरजी कोंडागाव यांचे संयुक्त पथक नक्षलविरोधी कारवाईसाठी रवाना करण्यात आले. छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा म्हणाले, आमचा एक सैनिक जखमी झाला आहे, तो धोक्याबाहेर आहे. सैनिकांनी चमत्कार केला आहे. २६ हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. अंतिम शोध मोहीम सुरू आहे.

# शेतकऱ्यांसाठी 'महाविस्तार ॲप'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती | शेतीशी संबंधित सर्व माहिती उपलब्ध

**मुंबई | वीरभूमी–**
शेतकऱ्यांना शेतीची सविस्तर माहिती देण्यासाठी 'महाविस्तार ॲप'ची निर्मिती करण्यात आली आहे. या महाविस्तार ॲपमध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामध्ये व्हीडीओही उपलब्ध करून दिला आहे. यात मराठीत चॅट बॉट उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही माहिती हवी असल्यास ती त्यांना मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यातील कृषिक्षेत्राच्या स्थितीचा आढावा घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यंदाच्या खरीप हंगामात २०४ लाख मेट्रिक टनांचे लक्ष्य ठेवले आहे. चांगला मान्सून झाला तर शेतीची उत्पादकता वाढते. दरवर्षी शेतीत ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असून त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर बोगस बियाणांपासून फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या साथी पोर्टलची मदत घ्यावी, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यंदा सरासरीपेक्षा ७ ते १७ टक्क्यांपर्यंत जास्त पाऊस असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. तसेच पावसाच्या



दोन खंडांमधील अंदाज हा जास्त नसेल, असेही हवामान खात्याने म्हटले आहे. राज्यात आवश्यक तेवढा बियाणांचा आणि खतांचा पुरवठा केला जाणार आहे. तसेच मागील वर्षाचा अनुभव लक्षात घेता कुठले पीक उपयोगी पडेल, याचा विचार केला जाणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दरम्यान, दुर्गम भागात सर्व गोष्टी पोहोचल्या पाहिजेत, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. त्यामध्ये कीड व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचे आहे. यावर्षी डिजिटल शेती शाळा प्रत्येक तालुक्यात आयोजित केल्या जाणार आहेत. त्यामुळे शेतातील नव्या पद्धतींवर आणि कीड व्यवस्थापनावर मार्गदर्शन मिळणार आहे.

### बियाणांसाठी 'साथी पोर्टल'चा वापर करा

केंद्र सरकारच्या साथी या पोर्टलवर बियाणांचे रजिस्ट्रेशन करावे लागते. त्यावरून त्या बियाणांचे उत्पादन कुठे केले जाते याची माहिती मिळते. बोगस बियाणांना आळा घालण्यासाठी हे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात जी बियाणे विकली जातील त्याची साथी पोर्टलवर नोंद करण्यात येणार आहे. यातून बियाणांची विक्री कुठे केली गेली, याचा ट्रेस घेतला जाणार आहे. यातून आपोआप बोगसगिरीला आळा बसेल.

### खताची लिंकिंग केल्यास कारवाई

खतांच्या लिंकिंगबाबतही कडक निर्णय घेतला जाणार आहे. प्रत्येक खत विक्री दुकानासमोर त्याचा बोर्ड लावला जाणार आहे. खते वगैरे या मोठ्या गोष्टी अनुदानावर दिल्या जातात. त्यामुळे कंपन्यांनी लिंकिंग केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# कोल्हापूर जिल्ह्यात तिघांना कोरोनाची लागण

**कोल्हापूर | वीरभूमी–**
कोल्हापूर जिल्ह्यात तिघांना कोरोनाची लागण झाली आहे. यातील एका रुग्णाला डिस्चार्ज देण्यात आला असून, दोघांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कोल्हापूर महापालिका हद्दीतील ८३ वर्षांच्या वृद्धाला कोरोनाची लागण झाली होती. १२ मे रोजी त्यांचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला. त्यानंतर त्यांच्यावर घरीच उपचार करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील एका ४० वर्षीय महिलेलाही कोरोनाची लागण झाली असून, त्यांचा अहवालही पॉझिटिव्ह आला आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शाहूवाडी तालुक्यातील एका ४० वर्षीय महिलेलाही कोरोनाची लागण झाली आहे. २० मे रोजी त्यांचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. सध्या या सर्वांची प्रकृती सुधारत असून ते लवकरच बरे होतील असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला.

देशात एकूण सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या २५७ वर पोहोचली आहे. केरळमध्ये सर्वाधिक ९५ पॉझिटिव्ह रुग्ण आहेत. तामिळनाडूमध्ये ६६, महाराष्ट्रात ५६ आणि कर्नाटकात १३ सक्रिय रुग्ण आहेत.

मुंबईतही कोरोनाचा शिरकाव झाला असून त्या पाठोपाठ पुणे

सोमवारी मुंबईतील केईएम रुग्णालयात २ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांचा मृत्यू झाला. तथापि, डॉक्टरांचे म्हणणे आहे की त्यांचा मृत्यू कोविडमुळे नाही तर दीर्घकालीन आजारामुळे झाला. एका रुग्णाला तोंडाचा कर्करोग होता आणि दुसऱ्याला नेफ्रोटिक सिंड्रोम, मूत्रपिंडाचा आजार होता.

# जमिनीची हिस्सेवाटप मोजणी अवघ्या २०० रुपयांत

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा निर्णय

**मुंबई | वीरभूमी–**
गावात भावकीत अथवा बांधावरून वाद काही नवा नाही. बांधावरून महाभारत हा गावकीच्या रहाटगाड्यातील रोजचाच प्रश्न आहे. शिवाय जमिनीची खरेदी-विक्री असू द्या अथवा न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतरची मोजणी प्रक्रिया असू द्या. त्यासाठीचे शुल्क अधिक, जादा असल्याचा सूर निघतोच. आता जमिनी मोजणीबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मोजणी शुल्कात मोठी कपात करण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केला आहे.

केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडू नये, हा यामागील उद्देश आहे. पूर्वी हिस्सेमोजणी शुल्क एक हजार ते चार हजार रुपये प्रति हिस्सा आकारण्यात येत होते. हे शुल्क आता



थेट २०० रुपयांवर आणण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

भूमि अभिलेख कार्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येते. पूर्वीसारख्या कार्यालयात खेटा मारण्याची गरज नाही. एका क्लिकवर काही कागदपत्रांसह शुल्क भरून जमीन मोजणीसाठी अर्ज करता येतो. केवळ २०० रुपये मोजणी शुल्क भरून एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्र व नकाशे देण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा मोजणी खर्च वाचणार आहे.

### तीन प्रकारे होते मोजणी

**साधी मोजणी :** साधी मोजणीला जास्त काळ लागतो. सहा महिन्यांत ही मोजणी करण्यात येते. सरकार दरबारी त्यासाठी १००० रुपये जमीन मोजणी शुल्क जमा करावे लागते.

**जलद मोजणी :** शेतकऱ्याला जर जमिनीची जलद मोजणी करायची असेल तर २००० रुपये भरावे लागतात. तरीही या मोजणीसाठी तीन महिन्यांची प्रक्रिया आहे.

**अतिजलद मोजणी :** या मोजणीसाठी शेतकऱ्याला ३००० रुपये जमा करावे लागतात. जलद मोजणीसाठी तीन महिने तर अतिजलद मोजणीसाठी एक हजार रुपये अधिक द्यावे लागतात.

# कोऱ्हाळे येथील भांबारे मळ्यातील तलावात बुडून बहिण-भावाचा मृत्यू

**राहाता | वीरभूमी–**
राहाता तालुक्यातील कोऱ्हाळे येथील भांबारे मळ्यातील साठवण तलाव निळवंडेच्या पाण्याने नुकताच भरला. या तलावात बुधवारी दुपारी २ सख्ख्या बहिण भावाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून या घटनेने परिसरातील हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे, मल्हारवाडी शिवारात राहत असलेल्या प्रशांत डोशी यांची मुले साहिल प्रशांत डोशी (वय १२, इयत्ता ६ वी) आणि दिव्या प्रशांत डोशी (वय १५, इयत्ता १० वी) ही निळवंडेच्या पाण्याने भरलेल्या साठवण तलावात पाणी पाहण्यासाठी गेले असता साहीलचा पाय घसरुन तो पाण्यात पडला. पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडू लागल्याने बहीण दिव्या हिने त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र तलावात पाण्याची खोली जास्त असल्याने दिव्याही पाण्यात बुडाली. दोघांचाही पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना स्थानिक युवकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी घटनेची माहिती मुलांचे वडील प्रशांत डोशी यांना दिली.





तोपर्यंत स्थानिक युवकांनी पाण्यात उड्या मारून साहील व दिव्याचा शोध सुरु केला होता. स्थानिक युवकांनी या दोन्ही मुलांना पाण्यातून बाहेर काढले. त्यांना तात्काळ राहाता ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

दोन दिवसपूर्वी या परिसरात तलावात निळवंडे कॅनॉलचे पाणी सोडण्यात आले. परंतु या मुलांना पाण्याचा अंदाज न आल्याने पोहण्यासाठी गेलेला या बहिण भावाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. साहील व दिव्या यांच्या पश्चात वडील प्रशांत, आई, एक बहिणी, आजी, आजोबा असा परिवार असून वडील प्रशांत हे शेतीबरोबरच शिर्डीत फुल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान साहील व दिव्या हे श्रीगणेश इंटरनॅशनल स्कुलमध्ये शिक्षण घेत होते. दोघेही अतिशय हुशार होते. दिव्या नुकतीच दहावी पास होऊन ११ वीत प्रवेश घेतला होता. मितभाषी व हुशार असलेल्या दिव्याने आपल्या भावाला वाचविताना स्वतःच्या जीवाचा विचार केला नाही. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. साहील व दिव्याचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्यांच्या आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला. ते पाहून जमलेल्या गर्दीलाही अश्रु अनावर झाले.

# SPOT NEWS

## नगर शहरातून अंजली दसपुते बेपत्ता; तोफखानात मिसिंग दाखल

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

तोफखाना पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार अंजली काकासाहेब दसपुते या मागील अनेक दिवसांपासून बेपत्ता आहेत. अंजली यांचे वय ३३ वर्षे असून, त्या मुकबधीर आहेत. दि. ११ मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजता कोणालाही काही न सांगता त्या घरातून निघून गेल्या आहेत. त्यानंतर आजतागायत त्यांचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही. अंजली यांचे दिव्यांग पती काकासाहेब दसपुते यांनी सर्व नातेवाईकांकडे, ओळखीच्या ठिकाणी तसेच परिसरातील विविध भागात शोध घेतला, मात्र कुठेही त्यांचा पत्ता लागला नाही. परिणामी त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. अंजली दसपुते यांच्याविषयी कोणालाही काही माहिती असल्यास अथवा त्या कुठे आढळल्यास तात्काळ तोफखाना पोलीस स्टेशनशी किंवा ९९२२७१७५२० या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राजशिष्टाचाराचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा : ॲड. सुरेश लगड

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली या यासंदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ॲड. सुरेश लगड यांनी केली आहे. न्यायमुर्ती भूषण गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून, त्यांची एवढ्या मोठ्या उच्च पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे ही बाब आपल्या सर्व महाराष्ट्रीयन यांना भूषणावह आहे. एवढ्या मोठ्या उच्च पदस्त न्यायमूर्तींबाबत राज शिष्टाचार पाळला जाऊ नये, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. राज शिष्टाचार न पाळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी यांना दोषी धरून त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी ॲड. सुरेश लगड यांनी केली. खरतर न्यायमूर्ती महोदय यांनीच घटनेच्या अनुछेद १४२ अन्वये कारवाई करावयास पाहिजे. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या जाहीर नाराजी नंतर आता महाराष्ट्र शासनाने सरन्यायाधीश हे आता कायमस्वरूपी राज्य अतिथी असतील असा आदेश काढून आपली चुक दुरुस्त केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्याचेही ॲड. सुरेश लगड यांनी म्हटले आहे.

## धामोरी येथील न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल ९६.५१ टक्के

● **कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील धामोरी येथील न्यू इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९६.५१ टक्के इतका लागला आहे. परीक्षेस एकूण ८६ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ताजणे सायली सचिन – ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम, खैरे वैष्णवी गोरख – ९३.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, हरळे तनिष्का नामदेव – ९२.८० टक्के गुण मिळवून तृतीय आले. निकालात ३४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, २० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी आणि २९ विद्यार्थ्यांनी पास क्लास मध्ये यश संपादन केले. केवळ ३ विद्यार्थी अपयशी ठरले. या यशाचे श्रेय मुख्याध्यापक बागल एस. टी., सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शालेय समिती, शालेय व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ, माता पालक संघ यांच्या मार्गदर्शनाला जाते. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पण आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले.

# श्रीगोंद्यात मान्सूनपूर्व पावसाने खरिपाची पेरभरणी

### खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांची लगबग | समाधानकारक पावसाच्या अंदाजाने शेतकऱ्यांमध्ये समाधान

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

१ मे २०२५ पासूनच श्रीगोंदा तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाने भक्कम हजेरी लावल्याने गेले २० दिवस संपूर्ण तालुक्यात पावसाळी वातावरण तयार झाले आहे. गेल्या २० दिवसात संपूर्ण मंडळात मिळून तालुक्यात सरासरी ६७.७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. या समाधानकारक वातावरणामुळे व पेरणीयोग्य वापसे निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची तयारी सुरू केली आहे. तर कृषी विभागानेही खरीप पेरणी क्षेत्र वाढण्यासाठी विविध उपाययोजनांवर भर दिला आहे.

तालुक्यात गेल्या २० दिवसांपासून सर्वदूर मान्सूनपूर्व पावसाचे दमदार आगमन झाले आहे. मुळात श्रीगोंदा तालुका पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडत असल्याने मान्सून पेक्षा मान्सूनपूर्व पावसाची येथील शेतकऱ्यांना प्रतीक्षा असते. सध्या आडसाली ऊस लागवड, लाल कांदा पेरणी, फळबागा लागवडी, एकदल–द्विदल धान्य, तेलबिया पिके व चारा पिकांच्या पेरणीसाठी योग्य वातावरण निर्मिती झाल्याने आधीच मशागती करून ठेवलेल्या जमिनींमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे. तर वातावरणात गारवा व चोहोबाजूंनी हिरवळ उगवू लागल्याने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना कोकणची अनुभुती मिळत आहे.

श्रीगोंदा तालुक्यात २० मे नंतर प्रस्तावित खरीप पेरणी अंदाजित क्षेत्र (सर्व आकडे हेक्टरमध्ये) आडसाली ऊसाची लागवड ७५०० हेक्टर, बाजरी– १०५००, मका– ९५००, तूर– ७०००, मूग– ३३००, उडीद– ३७००, भुईमुग– ५०, कापूस– ८०००, सोयाबीन– १६००, सूर्यफूल– ६० हेक्टरवर पेरणी संभावित आहे. तर मान्सूनने योग्य साथ दिली तर फळबागा, तेलबिया, सुगंधी औषधी पिके, ऊस, चारा पिके यात वाढ होण्याची शक्यता आहे. ऊसाचे क्षेत्र निम्म्याने घटून केळी लागवडीकडे शेतकरी वळला आहे. शेतकऱ्यांचे वार्षिक अंदाजपत्रक खरीप हंगामावर अवलंबून असते. खरीप चांगला झाला तर रब्बी व उन्हाळी पिकांचे नियोजन करता येते.

मान्सूनपूर्व पावसाने चांगली हजेरी लावली आहे. मान्सूनचे आगमन आधीच होण्याची शक्यता आहे. मान्सूनने साथ दिली तर शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येणार आहे. सध्या दिवसभर आच्छादित काळ्याभोर ढगांची गर्दी असून साधारण दुपारनंतर हमखास पावसाच्या संततधार सरी कोसळत आहेत. यामुळे शेतातील तणांचा प्रादुर्भाव सोडला तर शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.



### येणारे कृषी वर्ष समाधानकारक व्हावे

■ नगर जिल्ह्यात विशेषतः श्रीगोंदा तालुक्यात मान्सूनपूर्व पाऊस चांगला पडल्याने मोठ्या प्रमाणात पेरण्या होणार आहेत. काही कालावधीनंतर मान्सून योग्यवेळी सक्रिय झाला तर दुबार पेरणीचे संकट येणार नाही. शेतकऱ्यांना कुठेही खतांची कमतरता पडू नये याचे कृषी विभागामार्फत योग्य नियोजन केले आहे. तर युरिया, डीएपी, एनपीके, एसएसपी, एमओपी या खतांचा आपल्या तालुक्यात जिल्ह्याच्या मानाने सर्वाधिक बफर साठा आहे. साठेबाजी व ज्यादा दराने विक्रीवर आमचे संपूर्ण लक्ष राहणार आहे. उद्यापासून बियाण्यांची बनावटगीरी, खतांची लिंकिंग रोखण्यासाठी सर्व कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

– **शशिकांत गांगुर्डे**, तालुका कृषी अधिकारी

## केडगावमध्ये भीषण पाणीटंचाई व वारंवार वीज खंडितने नागरिक त्रस्त

### सुजय मोहिते यांचा आंदोलनाचा इशारा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव परिसरामध्ये मागील अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण पाणीटंचाई व वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नांकडे प्रशासन व महावितरणचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. या समस्यांबाबत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे केडगाव अध्यक्ष सुजय अनिल मोहिते यांनी महापालिका आयुक्त व महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे तातडीने प्रश्न सोडविण्याची मागणी केली आहे.

केडगावमधील पाण्याची भीषण टंचाई उन्हाळ्याच्या काळात विकोपाला गेली होती. नागरिकांना दररोज पाण्यासाठी आजही भटकंती करावी लागत आहे. मोहिते यांनी सांगितले की, पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करून नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा, यासाठी महापालिकेने तातडीने पावले उचलावी. महापालिकेच्या दुर्लक्षामुळे सामान्य जनतेचा संयम सुटत चालला आहे. जर लवकरच समस्या सोडविण्यात आली नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याप्रकरणी नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. मागील दोन ते तीन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे वाऱ्यामुळे झाडे व त्यांच्या फांद्या विद्युत वाहिन्यांवर पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. मात्र, महावितरणचे कर्मचारी वेळेवर प्रतिसाद देत नसल्याचा आरोप करण्यात आला. विजेचा पुरवठा सुरळीत करण्यास विलंब होत आहे आणि नागरिकांना अंधारात जीवन जगावे लागत आहे.

या दोन्ही गंभीर प्रश्नांकडे महापालिका व महावितरणने त्वरित लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा भाजयुमो अध्यक्ष सुजय मोहिते यांनी दिला आहे.

## बँकांनी सक्तीची कर्जवसुली थांबवली नाहीतर जनशक्ती रस्त्यावर उतरुन विरोध करेल

### कार्याध्यक्ष रामजी पोटफोडे | बेलगाव येथे जनशक्ती शाखेचे उद्‌घाटन

● **शेवगाव । वीरभूमी–**

एकीकडे शासन कर्ज वसुली बद्दल बोलून मते मिळवते व आता बँकेमार्फत शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुलीही करत आहे. यामुळे शेतकऱ्यांची सक्तीची कर्ज वसुली बँकांनी थांबवावी अन्यथा जनशक्ती रस्त्यावर उतरून याचा विरोध करेल, असा इशारा जनशक्तीचे कार्याध्यक्ष रामजी पोटफोडे यांनी केले आहे.



तालुक्यातील बेलगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानावरून पोटफोडे बोलत होते. यावेळी राजेंद्र फलके, रामकिसन घनवट, बंडू लोहकरे, राजेंद्र थोरात, त्र्यंबकराव त्रिंबके आदी उपस्थित होते.

यावेळी बेलगाव शाखेचे अध्यक्ष म्हणून नवनाथ पोपळे, सचिव अर्जुन जाधव, कार्याध्यक्ष लक्ष्मण लोहकरे, सचिव पांडुरंग जाधव, सदस्य मोतीराम लोहकरे, संजय थोरात, अशोक पालवे, बाळासाहेब जाधव, योगेश जाधव, हरिभाऊ लोहकरे, शरद जाधव, वैभव खरात यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

यावेळी पोटफोडे पुढे म्हणाले की, सध्या शेतकऱ्यांच्या अन्यायावर बोलायला कोणीच तयार नाही. सर्व सत्तेत जाऊन बसले आहेत. शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई मिळाली परंतु बँकेने शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड लावले असून शेतकऱ्यांची कर्जवसुली सक्तीने चालू केली आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. सत्तेवर येण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमाफीची खोटी आश्वासने देऊन मते मिळवत सत्तेवर आले. यामुळे कर्जमाफी होईल या आशेवर शेतकऱ्यांनी कर्ज भरले नाही. तसेच कपाशी, तूर, सोयाबीन, कांदे, ऊस आदी शेतीमालाला भाव नसल्याने व अवकाळी लहरी हवामानामुळे शेतकरी सतत आर्थिक संकटात आहे. आता तो कर्ज भरू शकत नाही. त्यामुळे सक्तीची कर्ज वसुली बँकांनी करू नये. अन्यथा जनशक्ती मोठे आंदोलन करून सक्तीची कर्ज वसुलीला विरोध करेल असा इशारा श्री. पोटफोडे यांनी दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊराव जाधव यांनी केले तर शरद जाधव यांनी आभार मानले.

## विखे पाटील आय. टी.आय. मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

● **नगर । प्रतिनिधी–**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आय.टी.आय.), एमआयडीसी, अहमदनगर येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एकूण ३६८ जागा उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य ए. व्ही. सूर्यवंशी यांनी केले आहे.

आजच्या काळात तांत्रिक शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. तांत्रिक कौशल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च पगाराच्या नोकऱ्यांच्या संधी मिळतात. शिक्षण पूर्ण होताच नोकरीची संधी उपलब्ध होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित होते. आय.टी.आय.चे ठिकाण एमआयडीसी परिसरात असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणाचा लाभ मिळतो.

संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना अनुभवी शिक्षक, उत्कृष्ट प्रशिक्षण, आणि आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे या संस्थेतून आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी नगर, सुपा, पुणे, औरंगाबाद, मुंबई येथील नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वी कारकीर्द घडवली आहे.

ऑगस्ट २०२५ प्रवेश सत्रासाठी इलेक्ट्रीशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, फिटर, वायरमन, वेल्डर, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रॅमिंग असिस्टंट, टर्नर, मशिनिस्ट, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन, मेकॅनिक मोटार व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, पेंटर जनरल, ड्राफ्ट्समन मेकॅनिकल या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

२६ मेपासून व्यवसाय पसंती नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. अधिक माहितीसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी, एमआयडीसी, अहमदनगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एकविरा फाउंडेशनच्या वतीने यशोधन कार्यालयात महिलांसाठी मोफत फायर अँड सेफ्टी प्रशिक्षण

● **संगमनेर । प्रतिनिधी–**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या व डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून महिला व तरुणींसाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असते. त्याचाच एक भाग म्हणून महिलांसाठी मोफत फायर अँड सेफ्टीचे प्रशिक्षण आज यशोधन कार्यालयात आयोजित करण्यात आले होते.



यशोधन कार्यालय झालेल्या कार्यक्रमात सूर्या गॅस कंपनीचे राजू थोरात व संतोष रुपवते यांनी फायर अँड सेफ्टी बाबत प्रशिक्षण दिले. यावेळी सौ अर्चनाताई बालोडे, नयनाताई राहणे, शीतल उगलमुगले, बेबीताई थोरात, दिपालीताई वर्पे, प्रमिलाताई अभंग, समिधा आरसिधी, अमृता राऊत आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिला सबलीकरण व सक्षमीकरण करणे हा एकविरा फाउंडेशनचा प्रमुख उद्देश असून महिला व युवतींना वेगवेगळ्या विषयांची माहिती असणे आवश्यक आहे या उद्देशाने अतिशय महत्त्वाच्या अशा फायर अँड सेफ्टी बाबत महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी राजू थोरात व संतोष रुपवते यांनी महिलांना घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर कसा वापरावा, कशाप्रकारे काळजी घ्यावी, गॅस गळती व दुर्घटना होण्याची प्रमुख कारणे व त्यावरील उपाय, गॅसची बचत आणि सुरक्षितता, गॅसमुळे होणारे अपघात व दुर्घटना टाळण्यासाठी काय करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी सुनीता कांदळकर यांनी एकविरा फाउंडेशनच्या आजपर्यंतच्या कामकाजाविषयी, कार्यपद्धती बाबत माहिती दिली.

सूत्रसंचालन शर्मिला हांडे मॅडम यांनी केले तर आभार सुनीता कांदळकर यांनी मानले.

# SPOT NEWS

## अहिल्यानगरमध्ये वीज वाहक तारांचा नागरिकांना धोका

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
प्रभाग क्रमांक दोनमधील वसाहतीत वीज वाहक तारा अत्यंत घराजवळून गेल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात शॉर्टसर्किट होऊन विजेचा धक्का लागण्याची शक्यता लक्षात घेता, यासंदर्भात नगरसेवक निखिल वारे यांनी विद्युत विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. मात्र विभागाने याकडे दुर्लक्ष केल्यानेअखेर डोके नगर भागात एक वीज वाहक तार तुटून जमिनीवर कोसळली आणि त्याचा संपर्क आल्यामुळे एका गायीचा मृत्यू झाला. या घटनेनंतर माजी नगरसेवक निखिल वारे यांनी गाईच्या मालकाला भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना माजी नगरसेवक निखिल वारे म्हणाले, मी सातत्याने विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला होता. अनेक वेळा निवेदनं दिली, प्रत्यक्ष भेटी घेतल्या, पण दुर्लक्ष झालं. ही दुर्घटना केवळ गायीपुरती मर्यादित राहिली, ही दुर्दैवाची बाब असली तरी उद्या एखाद्या माणसाच्या जीवाला धोका झाला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? ते पुढे म्हणाले, वीज तारा झाडांमध्ये अडकलेल्या, घराजवळून गेलेल्या अनेक ठिकाणी धोका कायम आहे. दोन दिवसांपूर्वी मी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देखील निवेदन दिलं आहे. त्यांनी तत्काळ कारवाईचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या तारा तातडीने दुरुस्त केल्या नाहीत, तर आंदोलनाचा इशाराही आम्ही देऊ.

## पर्यटकांनी ऐतिहासिक पर्यटनाचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष रेल्वेची घोषणा केली आहे. ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' तर्गत ९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. या सहलीव्दारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. या पाच दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी हाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक ळांना व्यापक प्रसिध्दी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात्रेदरम्यान गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटकांना आवश्यक सुविधा देण्यात येणार आहेत. सहलीचे नाव छत्रपती शिवाजी महाराज सर्किट असे असून जून रोजी शुभारंभ होणार आहे. कालावधी पाच ते सहा दिवसांचा असणार आहे. प्रारंभ व समाप्ती स्थान छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई असणार आहे. यात्रेचा वासमार्ग- मुंबई (सीएसएमटी), रायगड, पुणे, शिवनेरी, भीमाशंकर, प्रतापगड, कोल्हापूर, पन्हाळा, मुंबई असा आहे.

# शेवगावात तिरंगा रॅलीने सैनिकांच्या शौर्याला सलाम

### आ. मोनिका राजळेंकडून रॅलीचे आयोजन । भारत मातेच्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**● शेवगाव । वीरभूमी–**
पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबविले. या लष्करी कारवाईत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यामध्ये शंभरा पेक्षा जास्त दहशतवादी मारले गेले. प्रत्येक देशप्रेमींना याचा सार्थ अभिमान असल्याने या सैनिकांच्या सन्मानार्थ व त्यांचे मनोबल वाढविण्याठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शनाखाली देशभरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. कोणत्याही परकीय हल्ल्यापासून देशाचे संरक्षण करण्यास आणि देशाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारतीय सैन्य सक्षम आहे. आम्ही सर्व भारतीय एक आहोत, हे जगाला दाखवून या तिरंगा रॅलीद्वारे जवानांच्या शौर्याला सलाम करू या, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.



भारतीय लष्कराने केलेल्या यशस्वी 'ऑपरेशन सिंदूर' कारवाईच्या गौरवार्थ आणि लष्कराच्या सन्मानार्थ शेवगाव तालुक्यातील राष्ट्रप्रेमींनी आज बुधवारी शहरातून तिरंगा रॅली काढली. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, हम सेना के साथ है, ऑपरेशन सिंदूर के साथ राष्ट्र, अशा घोषणांनी परिसर दणाणला होता. आ. मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळ्याला अभिवादन करून तिरंगा यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी शहीद भगतसिंग, छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेबाबा, लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. मोनिका राजळे यांच्यासह प्रभारी तहसीलदार कारखिले, नगरपरिषदेच्या मुख्य अधिकारी विजया घाडगे, पोलीस निरीक्षक समाधान नागरे, उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक यांचेसह तालुक्यातील सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक संघटना, महिला भगिनी, भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदेगट), मनसे, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील सर्व माजी सैनिक व देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तिरंगा रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे खालच्या वेस मारुती मंदिराच्या सभागृह पर्यंत जावून येथे समारोप करण्यात आला. यावेळी सर्व माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेंद्र सुरवसे यांनी केले तर भिमराज सागडे यांनी आभार मानले.

## पदाधिकारी गट सोडून गेल्याने कोल्हे गटावर काहीही परिणाम होणार नाही : विजय डांगे

**● कोपरगाव । वीरभूमी–**
काकडी ग्रामपंचायतीच्या राजकारणात सध्या वैयक्तिक स्वार्थापोटी काही पदाधिकाऱ्यांच्या दलबदलामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना कोल्हे गटाचे ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य विजय डांगे यांनी परखड शब्दांत आपली भूमिका मांडली आहे. काही भूछत्र सोडून गेल्याने त्याचा सूर्यावर परिणाम होत नाही. तसाच काही पदाधिकारी गट सोडून गेले म्हणून कोल्हे गटावर परिणाम होणार नाही, या उलट जोमाने पक्षवाढीसाठी अनेकांना संधी मिळाली आहे असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.



डांगे पुढे म्हणाले, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी अनेक अशा व्यक्तींना शून्यातून सत्तेच्या गादीवर बसवलं, ज्यांचा सामाजिक आधार फारसा नव्हता. त्यांनी गावच्या विकासासाठी कोल्हे गटात राहून काम केल्याचं नाटक केलं, पण प्रत्यक्षात मात्र स्वार्थाचा भोपळा फोडत आपली खोटी ओळख निर्माण केली जी सध्याच्या घडल्या प्रकाराने उघड पडली आहे. कोल्हे कुटुंब हे केवळ राजकीय नेतृत्व नव्हे, तर कार्यकर्ते घडवण्याचे केंद्र आहे. डांगे यांनी ठामपणे सांगितले की, आजवर कोल्हे गटातून तयार झालेल्या अनेक कार्यकर्त्यांना अन्य गटांनी फोडाफोडीतून आपलेसे करण्याचा प्रयत्न केला त्यावरच स्वतःचे राजकारण जोपासले. मात्र, संधीसाधू हे केवळ हंगामी भूछत्र असून पावसाळा संपला की नाहीसे होतात, तशीच या दलबदलूंचीही अवस्था होणार आहे.

गावाच्या विकासासाठी निस्वार्थ काम करणाऱ्या विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली आजही असंख्य कार्यकर्ते एकनिष्ठपणे उभे आहेत. याचबरोबर उपकार विसरणाऱ्यांची प्रवृत्ती ही समाजात दीर्घकाळ टिकत नाही, असा टोला विजय डांगे यांनी लगावला. राजकारणात सत्तेच्या मोहापेक्षा निष्ठा, मूल्य आणि सेवा महत्त्वाची असते. हे विसरून स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी पाऊल उचलणाऱ्यांना काकडी ग्रामस्थ आणि वेळच योग्य उत्तर देईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## अमृतवाहिनी आयटीआयच्या २९ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वी मेगाकोट सरफेस ट्रीटमेंट कंपनीत निवड




**● संगमनेर । वीरभूमी–**
अमृतवाहिनी आयटीआय अमृतनगर संगमनेर येथे दिनांक २१ मे २०२५ रोजी मेगाकोट सरफेस ट्रीटमेंट सिन्नर, नाशिक येथील कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू नुकताच पार पडला असून यात २९ विद्यार्थ्यांची परीक्षा पूर्वी थेट निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

याविषयी अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी आयटीआय ने सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य दिले आहे. संस्थेमध्ये नोकरी करिता स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने विविध राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी समन्वय करार करण्यात आला आहे. आणि त्याचाच एक भाग म्हणून आता अमृतवाहिनीच्या २९ विद्यार्थ्यांची मेगाकोट सरफेस ट्रीटमेंट या कंपनीमध्ये निवड झाली आहे.

मेगाकोट सरफेस ट्रीटमेंटचे श्री संदीप सायखिंडीकर (डी.जी.एम ऑपरेशन), संग्राम जाधव (एच. आर. हेड) यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेड्च्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या त्यापैकी २९ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत निसर्गरम्य सुंदर परिसर, अत्याधुनिक सुविधा आणि प्लेसमेंट साठी परिपूर्ण प्रयत्न असल्याने संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या पगारावर थेट नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, विश्वस्त मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राध्यापक व्ही.बी. धुमाळ अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य विलास भाटे आदींनी अभिनंदन केले आहे.

## ना. विखे पाटील यांचे स्विय सहाय्यक शेवाळे यांच्या वांबोरी येथील घरी धाडसी चोरी

**● नगर । वीरभूमी–**
जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे स्वीय सहाय्यक उपमुख्य कार्यकारी अधिकारी समर्थ शेवाळे यांच्या वांबोरी येथील घरी चोरी झाल्याची घटना घडली आहे. समर्थ शेवाळे यांचे आई-वडील हे दोघेही सेवानिवृत्त शिक्षक आहेत. ते वांबोरी येथे सुभाषनगर भागात देहेरे रस्त्यालगत राहतात. सोमवार दि. १९ मे रोजी रात्री मुलीकडे एका कार्यक्रमानिमित्त नगरला गेले होते. या संधीचा फायदा घेऊन रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी गेटचे व घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. साहित्याची उचकापाचक केली. चोरी केल्यानंतर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर चोरटे बरोबर घेऊन गेले. सुमारे १० तोळे दागिने व दीड लाख रुपये रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाले आहेत. रात्री बारा वाजण्याच्या दरम्यान सहा चोरट्यांनी दोन दुचाकीवर येऊन घरात प्रवेश केला. त्यावेळी एक चोरटा बाहेर दुचाकीजवळच थांबला होता व पाच जणांनी कुलुप तोडून आत मध्ये जाऊन सर्व कपाटे, भांडे उचकून दहा तोळे सोने व दीड लाख रुपये रोख रक्कम यांच्या हाती लागला.

याचवेळी सुभाषनगर येथे राहणारे दोन तरूण गावातून रात्री साडेबाराच्या दरम्यान घरी चालले होते. घरी जात असताना त्यांना शेवाळे यांच्या घरासमोर एकजण दिसल्याने त्यांनी विचारपूस केली असता त्या चोरट्याने आतील चोरट्यांना आवाज दिला व ते सर्वजण बाहेर आले. त्यातील एकाने गावठी कट्टा काढून तुम्ही इथूनजा, नाहीतर तुम्हाला गोळ्या घालू, अशी धमकी दिली. हे दोन तरूण घाबरून तेथून निघून गेले. दरम्यान चोरट्यांनी दुचाकीवरून वांबोरीकडे धुम ठोकली. घटनेच्या ठिकाणी ज्येष्ठ नेते अ‍ॅड. सुभाष पाटील यांनी भेट देवून या घटनेचा ताबडतोब तपास लावण्यात यावा, अशी मागणी केली आहे. राहुरीचे पो. नि. संजय ठेंगे, उपनिरीक्षक समाधान फडवळ तसेच डॉग स्कॉड व फिंगरप्रिंटचे अधिकारी, वांबोरीचे पो. कॉ. आदिनाथ पालवे, वाल्मिक पारधी व निकम यांनी येऊन घटनेच्या सर्व माहिती घेतली. वांबोरी परिसरामध्ये नेक चोऱ्याच्या घटना घडत आहे. पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे पोलिसांची गस्त बंद आहे. ही गस्त पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## चार नंबर साठवण तलाव काँक्रीटिकरणाचे काम हाती घ्या; आ. आशुतोष काळेंच्या मुख्याधिकाऱ्यांना सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी–**
पाच नंबर साठवण तलावाच्या निर्मिती झाल्यापासून कोपरगाव शहरातील नागरीकांना नियमितपणे तीन दिवसआड पाणी पुरवठा होत आहे. परंतु पुढील पन्नास वर्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने मोठे क्षेत्रफळ असणाऱ्या चार नंबर साठवण तलावाची साठवण क्षमता वाढविणे काळाची गरज आहे. त्यासाठी चार नंबर साठवण तलावच्या काँक्रीटिकरणाचे काम हाती घ्या अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास जगताप यांना दिल्या आहेत.



कोपरगाव शहरातील नागरीकांची तहान भागविण्यात कोपरगाव शहराला पाणी पुरवठा करणारे एक ते चार साठवण तलाव असमर्थ ठरले होते. कोपरगाव शहराच्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणी आरक्षित असतांना देखील साठवण क्षमता नसल्यामुळे कोपरगाव शहरातील नागरिकांना आठ दिवसापासून ते कधी एकवीस दिवसांनी पाणी पुरवठा होत होता. परंतु आ. आशुतोष काळे यांनी कोपरगावच्या जनतेला पाणी प्रश्न सोडविण्याचा दिलेला शब्द पूर्ण करून पाच नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण झाल्यांनतर कोपरगावकरांना नियमितपणे तीन दिवसआड पाणी पुरवठा होत आहे. कित्येक दशकापासूनचा पिण्याच्या पाण्याचा सुटलेला प्रश्न व कोपरगाव शहरातील रस्त्यांचा झालेला विकास व इतरही विकास कामांमुळे शहरातील बाजारपेठेवर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. परंतु भविष्यकाळाचा विचार करता यावरच थांबणे योग्य नाही.

पाणीपुरवठा करणाऱ्या एक ते तीन साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु त्याचबरोबर कोपरगाव शहरात होणाऱ्या एमआयडीसीमुळे वाढणारी लोकसंख्या गृहीत धरून कोपरगाव शहराच्या पिण्याच्या पाण्याचे आरक्षण आ.आशुतोष काळे यांनी मंजूर करून घेतलेले आहे. त्यामुळे मंजूर असलेले पाणी वेळच्या वेळी उचलले जाणे गरजेचे असून त्यासाठी साठवण क्षमता वाढविणे देखील तेवढेच गरजेचे आहे. त्यामुळे कोपरगावच्या नागरीकांना नियमितपणे तीन दिवसआड पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु राहणार आहे. त्यासाठी लवकरात लवकर चार नंबर साठवण तलावाच्या काँक्रीटिकरणाचे काम हाती घेणे गरजेचे असून चार नंबर साठवण तलावाच्या काँक्रीटिकरणाचे कामासाठी प्रस्ताव तयार करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास जगताप यांना दिल्या आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# अकोले तालुका एज्युकेशन संस्था कोणा एकाची नसून सर्व सामान्यांची

## माजी आ. वैभवराव पिचड यांची ग्वाही । अकोले महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती

**अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी ही संस्था कोणत्याही एका व्यक्ती अथवा कुटुंबाची नाही. ती सर्वसामान्य माणसांची आहे आणि भविष्यातही सर्वसामान्य माणसांचीच राहील, अशी निसंदिग्ध ग्वाही संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैभवराव पिचड यांनी दिली.

तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे, जिल्हा बँकेचे संचालक अमित भांगरे यांचेसह अन्य कार्यकर्त्यांनी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संदर्भात अलीकडे वेगवेगळ्या पत्रकार परिषदा घेऊन काही आरोप केले होते. त्या संदर्भात अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे वतीने भूमिका स्पष्ट करण्यासाठी आज अकोले महाविद्यालयातील कॉन्फरन्स हॉल मध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या व विरोधकांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना संस्थेचे कार्यकारी विश्वस्त तथा माजी आमदार वैभवराव पिचड यांनी स्पष्ट व समर्पक शब्दात उत्तरे दिली.

प्रारंभी संस्थेचे सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांनी स्वागत केले. अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय व संस्थेच्या सर्व विद्यालय, ज्युनियर कॉलेज यांचे दहावी, बारावी व अन्य परिक्षेचे निकाल उत्कृष्ठ लागल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचेसह संस्थेचे सभासद, आजी-माजी विद्यार्थी, विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या श्रद्धांजलीचा ठरावही त्यांनी मांडला. उपस्थितांनी दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, विश्वस्त मधुकरराव सोनवणे, अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, कार्यकारिणी सदस्य यशवंतराव आभाळे, डॉ. डी. के. सहाणे, कल्पना ताई सुरपुरीया, आनंदराव नवले, शरदराव देशमुख, सुधाकरराव आरोटे, रमेशराव जगताप, शिक्षणाधिकारी संपतराव मालुंजकर आदी उपस्थित होते.

यावेळी वैभवराव पिचड पुढे म्हणाले की, बाहेरच्यांची सुपारी घेऊन काहीजन संस्थेची बदनामी करण्यासाठी बोलतात की काय? असा सवाल उपस्थित करीत मागील आंदोलनानंतर ॲडमिशन कमी झाले आहेत, असे स्पष्ट केले.

तसेच मी कधी ही माझ्या कुटंबातील सदस्य घ्या, असे म्हटलेले नाही व माझ्या परिवारातील कोणाचाही सदस्य होण्यासाठी अर्ज केलेला नाही.

विद्यमान आमदारांनी त्यांच्या पक्षात असलेले व संस्थेचे कायम विश्वस्त गायकर साहेब व कार्यकारिणी सदस्य यांचे राजीनामे घेतले. त्याच्या मागील काय हेतू होता कळाला नाही, जर राजीनामे घेतले होतेच तर आमदारांनी स्वत:जवळ का ठेवले नाहीत. आमदारांनी राजीनामे दिलेल्या लोकांचा बळी दिलाय? असा सनसनाटी आरोप केला.

विद्यमान आमदारांनी स्व. पिचड साहेबांबद्दल केलेले एकेरी उल्लेख खटकला असून आमच्या कुटुंबाने राजकीय विरोध बाजूला ठेऊन नेहमी स्वर्गीय मंडळीचा आदरच केलेला आहे असे मत व्यक्त केले.

तसेच संपत मालुंजकर यांना कोणत्याही समितीचे अध्यक्ष केलेले नाही. त्यांच्यावर कोणताही गुन्हा नाही. ते १९८५ पासून संस्थेचे कामकाज पहात आहे. त्यामुळे त्यांच्यावर वैयक्तिक पातळीवर आरोप करताना त्याची शहानिशा केली पाहिजे. आज अनेकांवर गुन्हे दाखल असून हे सर्वांना माहीत आहे पण आम्ही वैयक्तिक पातळीवर बोलणार नाही असा टोला अमित भांगरे यांना मारला.

विद्यमान आमदार यांनी तालुक्यातील काही शिक्षण संस्थांची चौकशी लावली त्याबद्दल आपले मत काय आहे? या पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना श्री पिचड म्हणाले की, तालुक्यातील शिक्षण संस्था ह्या सर्वांनी शून्यातून उभ्या केलेल्या आहेत. तसेच कोतुळ महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे बांधकाम सुरू केले असतांना विद्यमान आमदार यांच्या खंदे समर्थकांनी आणलेला अडथळा बाजूला करण्यास विद्यमान आमदारांनी त्या कार्यकर्त्यास सांगावे, असे मत व्यक्त केले. कोणाच्याही शैक्षणिक संस्था मध्ये राजकारण करू नये असा सल्ला दिला.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शिक्षण शाखा ह्या स्व. माजी मंत्री पिचड साहेब हे आमदार झाल्यानंतर सुरू झालेल्या आहेत. तसेच साहेब सभापती असताना रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या मजुरांकडून आर्थिक मदत घेण्यासाठी संस्थेने त्यांना बोलावून घेतले. त्यानंतर पिचड साहेब यांनी जिल्हा परिषदेत विशेष ठराव मंजूर करून हा एक एक रुपया संस्थेला मिळवून दिला. याची यावेळी त्यांनी विरोधकांना आठवण करून दिली.

तसेच संस्थेची घटना ही १९७२ ची असून त्यावेळी पिचड साहेब हे संस्थेच्या कार्यकारिणी मध्ये व विश्वस्त मंडळात ही नव्हते. त्यामुळे त्यांनी घटना बदलली हा आरोप चुकीचा आहे. संस्थेच्या कायम विश्वस्त मंडळाच्या निवडीला काही सभासदांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सदर बाब न्याय



प्रविष्ट असल्याने न्यायालय ज्यावेळी निकाल देईल त्यानंतर सर्व सभासदांना विचारात घेऊन योग्य तो निर्णय घेऊ असे स्पष्ट केले.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी मध्ये २०१२ पासून अनुदानित तत्वावर कोणतीही भरती झालेली नाही. तसेच २०१९ मध्ये झालेल्या भरतीमध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही.तसेच पिचड नावाचा एकही कर्मचारी भरलेला नाही. त्यामुळे संस्थेत नोकर भरतीत भ्रष्टाचार झाला. असा बिनबुडाचा आरोप केला जात आहे. आपल्याकडे भ्रष्टाचाराचे काही पुरावे असतील तर घेऊन यावे त्यावर आपण समोरासमोर बसून निर्णय घेऊ. इतरांसारखे स्वतः च्या संस्थेत स्वतःचे नातेवाईक भरलेले नाही हे आरोप करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. असा टोला लगावला.

पत्रकार परिषदेत काही ज्येष्ठ वकिलांनी अभ्यास करून बोलणे गरजेचे होते. संस्थेच्या कायम विश्वस्त नेमणुकीच्या विरोधात न्याय प्रविष्ट असल्यास आपण कशी कोणाची नेमणूक करू शकतो, याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत देणे आवश्यक होते.

सध्या संस्थेचे ऑडिट चालू असून ऑडिट रिपोर्ट आल्यावर संस्थेच्या घटनेनुसार सभासदांची सभा बोलावून योग्य ते निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. अगस्ति कारखाना ही तालुक्याची भाग्यलक्ष्मी असून ती टिकली पाहिजे त्यामुळे मला पिचड साहेब यांनी अगस्ति कारखाना बाबत काहीही बोलायचे नाही असे सांगितले. उलट मला अगस्ति टिकावा म्हणून केंद्राचे पॅकेज आणण्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याकडे पाठविले. पिचड साहेब यांनी कारखाना माझ्याकडे नसला तरी ती तालुक्याची कामधेनू आहे ती टिकली पाहिजे म्हणून स्वतः ही फोन करून केंद्राचे पॅकेजसाठी सांगितले होते. याची आठवण करून दिली.

तसेच सध्या अगस्तिचे चेअरमन सीताराम पा गायकर हे आजारी असून ते चेअरमन पदाचा राजीनामा देणार असल्याचे समजले.

आमदार किरण लहामटे यांनी कारखान्याच्या निवडणूकीमध्ये शेतकरी समृद्धी मंडळाचे नेतृत्व केले होते त्यांनी कारखान्याचे चेअरमन व्हावे व कारखाना सांभाळावा, आमचा त्यासाठी कोणताही आक्षेप नाही असे सांगितले.

यावेळी सुनील दातीर यांनी २०२२ मध्ये कार्यकारी विश्वस्त म्हणून स्व.पिचड साहेब यांनी आंदोलकांच्या सर्व १४ मागण्या मान्य करून तसे लेखी पत्र दिले होते. व कोणीही सोशल मीडियावर म्हणणे मांडल्यास अथवा पत्रकार परिषद घेतल्यास सदरचा करार संपुष्टात येईल असे सांगितले होते, असे असूनही आंदोलकांनी संस्थेच्या विरोधात व लेखी पत्राबाबत पत्रकार परिषद घेऊन सदर करार संपुष्टात आणला त्यामुळे पुढे दिलेल्या लेखी पत्राच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली नाही व करण्याचे काहीही कारण नाही. त्यानंतर २५/१२/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याबाबत चर्चा झालेली आहे हे स्पष्ट केले.

डॉ. डी. के. सहाणे यांनी संस्था स्थापने पासूनचा संस्थेच्या प्रगतीचा अहवाल मांडला. शरदराव देशमुख यांनी आम्ही २०२२ पासून संस्थेत कार्यकारिणी सदस्य म्हणून काम करीत आहे. आम्हाला कोठेही अनुचित प्रकार जाणवला नाही. सभासदांनी हक्काने त्यांना आलेल्या शंका बद्दल विचारले पाहिजे, खात्री करून माहिती घेऊन आरोप करणे गरजेचे आहे.

यशवंतराव आभाळे यांनी संस्थेच्या कामाबाबत माहिती दिली. प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी सर्व विद्यालय, महाविद्यालय व इतर शाखांच्या प्रगतीचा अहवाल मांडला.

# प्राजक्ता कोथिंबीरे यांची युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीत प्रशासकीय अधिकारीपदी निवड

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण ंस्थेच्या श्री रामेश्वर विद्यालय, वखली (ता. श्रीगोंदा) येथील ुख्याध्यापक संजय सिताराम ोथिंबीरे यांची कन्या कु. प्राजक्ता ानिषा संजय कोथिंबीरे हिची न्द्र शासनाच्या युनायटेड इंडिया न्शुरन्स कंपनीमध्ये प्रशासकीय ाधिकारी (वर्ग-१) या पदावर ंपूर्ण भारतातून १०० जागांसाठी ाण्यात आलेल्या पात्रता परीक्षा व ुलाखतीद्वारे गुणवत्तेनुसार निवड ाली आहे.

प्राजक्ताने २०२२ मध्ये ासकीय कृषी महाविद्यालय, ुळे येथून बीएससी (कृषी) दवी प्राप्त केली. त्यानंतर तिने पर्धा परीक्षेची तयारी सुरू ली आणि मेहनतीच्या जोरावर



चालू वर्षी तीन ठिकाणी यश मिळवले. तिची आयडीबीआय बँकेत एक्झिक्यूटिव्ह, बँक ऑफ इंडियामध्ये आयबीपीएस असिस्टंट आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीत प्रशासकीय अधिकारी (वर्ग-१) या पदांवर निवड झाली आहे.

प्राजक्ताच्या या यशाबद्दल सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा शिवाजीराव नागवडे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सोनिया गांधी, छत्रपती शिक्षण संस्था आणि ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर, प्राचार्य, मुख्याध्यापक उपस्थित होते. तसेच जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे, नागवडे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, पुणे विभागीय कार्यालयाचे सह आयुक्त अरुण आनंदकर, माजी उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल कोथिंबीरे, सर्व आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, सेवा सोसायट्यांचे चेअरमन, व्हाइस चेअरमन, संचालक, रयत शिक्षण संस्था, छत्रपती शिक्षण संस्था, ज्ञानदीप शिक्षण संस्थेतील सर्व निरीक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी प्राजक्ता आणि कोथिंबीरे कुटुंबीयांचे हार्दिक अभिनंदन केले.

प्राजक्ताच्या या यशाने चिखली गावासह संपूर्ण श्रीगोंदा तालुक्याचा मान वाढला आहे. तिच्या या यशासाठी सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हाधिकारी स्तरावरच १०० टक्के शास्ती माफीसाठी मुख्यमंत्र्यांना विवेक कोल्हेंचे साकडे

**कोपरगाव । वीरभूमी –**
मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना दिलेल्या पत्रात सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी अभय योजनेचे स्वागत करुन काही अटी शर्तीमध्ये बदल करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. नगरपालिकांमधील तसेच नगर परिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावर शास्ती (दंड) बाबत प्रोत्साहन अभय योजना लाभ नागरिकांना मिळण्यासाठी शासन स्तरावरून आदेश होऊन ५०% ऐवजी पूर्ण १००% टक्के माफ करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार मिळावे अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. अभय योजना ही एक ऐतिहासिक प्रक्रिया ठरणार असून अतिशय चांगली योजना मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस आणि सर्व मंत्री मंडळाने सुरू केली आहे अशी प्रतिक्रिया कोल्हे यांनी व्यक्त केली आहे.

या मागणीमागील प्रमुख हेतू असा आहे की, सध्या राज्य शासनाच्या निर्णयानुसार मालमत्ता करावरील शास्ती ५० टक्के माफ करण्याची तरतूद आहे. मात्र, नागरिकांना अधिक प्रोत्साहन मिळावे तसेच करसंकलन वाढावे यासाठी शास्तीची १०० टक्के माफी मिळावी, याकरिता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर प्रस्ताव सादर करून तो शासनाला सादर करावा अशी प्रक्रिया आहे मात्र जिल्हाधिकारी स्तरानंतर होणारी पुढील प्रक्रिया अधिक विलंबाची ठरेल.

यासाठी जिल्हाधिकारी यांना १००% अधिकार देण्याचा निर्णय घेतल्यास महाराष्ट्रातील नगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रातील करदात्यांना मोठा दिलासा मिळेल. तसेच प्रलंबित थकीत कराचा भरणा लवकरात लवकर होण्यास हातभार लागेल. जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत संबंधित विभागांना शिफारस पाठवून नागरिकांना लवकरात लवकर १०० टक्के शास्ती माफीचा लाभ मिळावा यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे अशी मागणी कोल्हे यांनीं केली आहे.

# नागरिकांना शुद्ध पाणी देण्याचा जिल्हा परिषदेचा निर्धार


**अहिल्यानगर । वीरभूमी –**
जिल्ह्यातील नागरिकांना शुध्द सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या तीने मोठ्या प्रमाणावर पाणी ुणवत्ता तपासणी व जनजागृती ोहीम हाती घेण्यात आली आहे. या ोहिमेअंतर्गत ७ जून २०२५ पर्यंत जल्ह्यातील सर्व १५७५ गावांमध्ये ेत्रीय तपासणी संच (एफ.टी. ५.) च्या माध्यमातून पिण्याच्या ाण्याची रासायनिक व जैविक पासणी करण्यात येणार आहे. जल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी धिकारी आशिष येरेकर यांनी ा अभियानाचा बुधवारी शुभारंभ ला. यावेळी बोलताना त्यांनी ांगितले की, प्रत्येक नागरिकांना ुध्द पाणी मिळावे यासाठी प्रशासन कटिबध्द आहे. गावपातळीवर थेट नागरिकांच्या सहभागातून पाण्याची तपासणी करून जनजागृती करणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, सुभाष सातपुते, दादाभाऊ गुंजाळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे तसेच सर्व गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी उपस्थित होते. पाणी गुणवत्ता तपासणी मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार गावपातळीवर एफ.टी. के. संचाचा वापर करून रासायनिक व जैविक तपासणी केली जाणार आहे. गावागावांमध्ये पूर्वनियोजित पध्दतीने पाच महिलांची निवड व त्यांची पडताळणी करण्यात आली असून, त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासोबतच आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना एफ.टी. के. संचाचा वापर करून पाण्याची तपासणी करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळा, अंगणवाड्या व घरगुती नळजोडणीच्या पाण्याचे नमुने गोळा करून तपासले जातील. तपासणीचे सर्व नोंदी 'डब्ल्यूक्यूएमआयएस' या पोर्टलवर अपलोड केल्या जातील. नळ पाणीपुरवठा योजनांचे पाणी स्त्रोत, शाळा, अंगणवाड्या व घरगुती नळजोडण्यांची तपासणी एफ. टी.के. च्या माध्यमातून करण्यात येईल. गावपातळीवरील नागरिकांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण होण्यासाठी विशेष जनजागृती उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

# अमृतवाहिनीच्या निडो इंटरनॅशनल स्कूलचा १००% निकाल

**संगमनेर । वीरभूमी–**
अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे निडो इंटरनॅशनल स्कूलच्या दुसऱ्या बॅचने आयजीसीएसई केंब्रिज अभ्यासक्रम (ग्रेड १०) शंभर टक्के निकालाची कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध वातावरण, आणि अमृतवाहिनी संस्थेचे नियोजन अधोरेखित झाले आहे, अशी माहिती निडो स्कूलच्या शाळा संचालिका सौ. अंजली कन्नावार यांनी दिली आहे.

संस्थेच्या विश्वस्त सौ. शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली


अन्वित लिंबेकर


तन्मय सोनवणे


सात्विक हासे

अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलने शालेय उपक्रमाबरोबर आपली गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. दहावीच्या परीक्षेसाठी स्कूल मधून १२ विद्यार्थी बसले होते व सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास झाले असून एकूण निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले आहेत. यामध्ये कु. अन्वित अशोक लिंबेकर ८९.१७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तन्मय दिलीपकुमार सोनवणे याने ८८% टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. दोन विषयात प्रथम क्रमांक याने मिळविला आहे. सात्विक नितीन हासे याने ८६.५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच रिया निलेश पटणी या विद्यार्थिनीने बायोलॉजी मध्ये ८५ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, संस्थेच्या विश्वस्त सौ. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही.बी. धुमाळ, डॉ. जे.बी.गुरव, शाळा संचालिका सौ अंजली कन्नावार यांनी अभिनंदन केले.